पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद पालघर
पत्ता- जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पंचायत समिती निवासस्थान,
नवली मार्ग, मु.पो.ता.पालघर, जि. पालघर पिन- 401404
dahopalghar@gmail.com **दुरध्वनी**- 02525 257990

---

जा.क्र. – पाजिप/ पसं/ तां/ 509 /2019 , दि. 27/5/2019

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
पालघर

जन संपर्क अधिकारी,
जिल्हा परिषद पालघर

विषय- जिल्हा वार्षिक योजना व जिल्हा परिषद उपकर योजना सन 2019-20 राबविणे कामी वर्तमान पत्रांत प्रसिध्दी देणे बाबत

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की,

2/- जिल्हा वार्षिक योजना व जिल्हा परिषद उपकर योजना सन 2019-20 पालघर जिल्ह्यात राबविण्यात येणार आहेत. सोबत विविध 11 योजने अंतर्गत जिल्ह्याचे लक्षांक व योजनेचे वेळापत्रक सादर करीत आहोत.

3/- आपणास विनंती करण्यात येत आहे की, योजनेची माहिती स्थानिक पशुपालकांना मिळणेसाठी कृपया सदर योजनांचे वेळापत्रक व माहिती आपणा मार्फत स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात यावी.

3/- जिल्ह्याचे लक्षांक

| अ.क्र. | योजनेचे नांव | लक्षांक |
|---|---|---|
| 1 | जिल्हा वार्षिक योजना - एक दिवसाची 100 कुक्कुट पिल्ले वाटप | 100 |
| 2 | जिल्हा वार्षिक योजना - वैरणीचे ठोंब / बियाणे वाटप | 333 |
| 3 | जिल्हा वार्षिक योजना - आदिवासी घटक कार्यक्रम- दुधाळ जनावरे वाटप | 76 |
| 4 | जिल्हा वार्षिक योजना - आदिवासी घटक कार्यक्रम- शेळी गट वाटप | 70 |
| 5 | जिल्हा वार्षिक योजना - विशेष घटक कार्यक्रम- दुधाळ जनावरे वाटप | 10 |
| 6 | जिल्हा वार्षिक योजना - विशेष घटक कार्यक्रम- शेळी गट वाटप | 10 |
| 7 | जिल्हा वार्षिक योजना - विशेष घटक कार्यक्रम – तीन दिवसांचे प्रशिक्षण | 30 |
| 8 | जिल्हा परिषद उपकर योजना – महिलेला संकरीत गाय खरेदीसाठी अर्थ सहाय्य | 75 |
| 9 | जिल्हा परिषद उपकर योजना – महिलेला म्हैस खरेदीसाठी अर्थ सहाय्य | 75 |
| 10 | जिल्हा परिषद उपकर योजना – अपंग पशुपालकाला म्हैस खरेदीसाठी अर्थ सहाय्य | 27 |
| 11 | जिल्हा परिषद उपकर योजना – बचत गटातील महिलेला कुक्कुटपक्षी खरेदीसाठी अर्थ सहाय्य | 888 |

4/- सर्व योजनांचे अर्ज सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांत व पशुसंवर्धन विभाग, तालुका पंचायत समिती येथे उपलब्ध आहेत. योजनेत लाभ घेण्यास इच्छुक पशुपालकांनी त्यांचे परिपुर्ण अर्ज **दि.** 29/6/2019 पर्यंत नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात सादर करावेत.

6/- **दि.9/7/2019 ते 15/7/2019** या कालावधित लाभार्थि निवड व प्रतिक्षा यादी जिल्हा स्तरावर तयार करण्यात येणार आहे. 15/7/2019 पासुन योजनेची अंमलबजावणी सूरु करण्यात येईल.

8/- अर्जदाराने त्याचा अर्ज पुर्ण भरलेला, स्पष्ट वाचता येइल असा, खाडाखोड न केलेला, आवश्यक सर्व दाखले व प्रमाणपत्रासहीत वेळीच सादर करावा. अर्जदाराकडे स्वतःच्या मालकिची जमिन नसल्यास त्याने केलेल्या नोंदणीकृत भाडेपट्टीच्या कराराची मुळ प्रत सादर करावी.

9/- अर्जदार अपंग असल्यास त्याने त्याचा अपंगत्वाचा साक्षांकित दाखला अर्जासोबत जोडावा.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

प्रत - माहितीसाठी सविनय सादर
मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई विभाग, मुंबई-65
मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर
मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, पालघर

## जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. पालघर मार्फत राबविण्यात येणा-या योजना

### (1) जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना - एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम – एक दिवसाची 100 पिल्ले वाटप करणे

**प्रमुख अटी**- लाभार्थी ग्रामिण भागातील रहिवासी असावा. या योजनेचा लाभ सर्व प्रवर्गासाठी देण्यात येतो.

**योजनेचे स्वरुप :**

| अ.क्र. | बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | एक दिवसाची 100 सुधारीत जातीचा कुक्कुट पिल्ले खरेदी करणे | 2000 |
| 2 | प्रती किलो रु.15.50 दराने 800 किलो कुक्कुट खाद्य | 12400 |
| 3 | पिल्ले वाहतूक खर्च | 100 |
| 4 | औषधे | 150 |
| 5 | रात्रीचा निवारा उभारण | 1000 |
| 6 | खाद्याची भांडी | 350 |
|  | एकुण | 16000 |

या कार्यक्रमा अंतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना 50 % अथवा कमाल रु.8000/- अनुदान दिले जाते. लाभार्थीने योजने अंतर्गत सर्व बाबींची पुर्तता केल्या नंतर लाभार्थीचे अनुदान त्याच्या बँक बचत खात्यात थेट जमा करण्यात येते.

### (2) जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना - वैरण व पशुखाद्य विकास – वैरणीचे बियाणे / ठोंबे वाटप

**प्रमुख अटी**- लाभार्थी ग्रामिण भागातील रहिवासी असावा. या योजनेचा लाभ सर्व प्रवर्गासाठी देण्यात येतो. लाभार्थी अगर त्याच्या कुटूंबाकडे वैरण लागवडीसाठी आवश्यक सुविधा असलेली किमान 1 एकर (40 आर) जमिन असावी.

**योजनेचे स्वरुप** :

| अ.क्र. | बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | वैरणीचे बियाणे (उदा. मका, ज्वारी, बाजरी, ल्युसर्न, बर्सिम, ओट इ. )<br>अथवा वैरणीचे ठोंब (उदा. यशवंत, जयवंत, पॅराग्रास, डि.एच.एन., इ. ) खरेदी करणे | 600 |
|  | एकुण | 600 |

या कार्यक्रमा अंतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना 100 % अथवा कमाल रु.1500/- अनुदान दिले जाते. लाभार्थीने योजने अंतर्गत लाभार्थीला शासकीय प्रक्षेत्रावरुन / संस्थेकडून वैरण बियाणे / ठोंबे खरेदी करुन पुरवठा करण्यात येतात.

### (3 व 4) जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी घटक कार्यक्रम / विशेष घटक कार्यक्रम ) - दुभत्या जनावरांचा पुरवठा

**प्रमुख अटी**- लाभार्थी ग्रामिण भागातील रहिवासी असावा. लाभार्थीने अर्जा सोबत अनुसूचित जमातीचा / अनुसूचित जातीचा साक्षांकीत दाखला सादर करावा. लाभार्थी अगर त्याच्या कुटूंबाकडे शेत जमिन असावी.

**योजनेचे स्वरुप :**

| अ.क्र. | बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | प्रती गाय/ म्हैस किंमत रु. 40000/- प्रमाणे 2 संकरीत गाई / म्हशी खरेदी करणे | 80000 |
| 2 | 3 वर्षाचा विमा काढणे | 5061 |
|  | एकुण | 85061 |

या कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थीला विमा काढणेसाठी विमा रक्कमेच्या 75 % अगर कमाल रु.3796 तर गाय/ म्हैस खरेदीसाठी खरेदी किंमतीच्या 75 % अगर कमाल रु.60000 अनुदान दिले जाते. लाभार्थीने स्वतःच्या खर्चाने गाय/ म्हैस खरेदी केल्यानंतर लाभार्थीचे अनुदान त्याच्या बँक बचत खात्यात थेट जमा करण्यात येते.

### (5 व 6) जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी घटक कार्यक्रम / विशेष घटक कार्यक्रम ) - शेळी गट पुरवठा

**प्रमुख अटी**- लाभार्थी ग्रामिण भागातील रहिवासी असावा. लाभार्थीने अर्जा सोबत अनुसूचित जमातीचा / अनुसूचित जातीचा साक्षांकीत दाखला सादर करावा. लाभार्थी अगर त्याच्या कुटूंबाकडे शेत जमिन असावी.

**योजनेचे स्वरुप :**

| अ.क्र. | बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | प्रती शेळी रु.4000/- प्रमाणे 10 शेळ्या व प्रती बोकड रु.5000/- प्रमाणे 1 बोकड | 45000 |
| 2 | 3 वर्षांचा विमा काढणे | 2848 |
| | एकुण | 47848 |

या कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थीला विमा काढणेसाठी विमा रक्कमेच्या 75 % अगर कमाल रु.2136 तर शेळीगट खरेदीसाठी खरेदी किंमतीच्या 75 % अगर कमाल रु.33750 अनुदान दिले जाते. लाभार्थीने स्वतःच्या खर्चाने शेळीगट खरेदी केल्यानंतर लाभार्थीचे अनुदान त्याच्या बँक बचत खात्यात थेट जमा करण्यात येते.

**(7) जिल्हा वार्षिक योजना (विशेष घटक कार्यक्रम) - अनुसुचित जाती / नव बौध्द लाभार्थीला पशुसंवर्धन विषयक तिन दिवसाचे प्रशिक्षण देणे**

**प्रमुख अटी**- लाभार्थी ग्रामिण भागातील रहिवासी असावा. लाभार्थीने अर्जा सोबत अनुसूचित जातीचा / नव बौद्ध असल्याचा साक्षांकीत दाखला सादर करावा.

**योजनेची संक्षिप्त माहिती** : अनुसुचित जाती / नव बौध्द लाभार्थ्यांना पशुपालन बाबत प्रशिक्षण देवून स्वयंरोजगारद्वारे उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याकरिता मदत करणे हा योजनेचा उद्देश आहे. लाभार्थी गटाला तीन दिवसांचे अनिवासी प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणासाठी चहा, पाणी, जेवण, प्रशिक्षण साहित्य, प्रवास खर्च इ. करीता **प्रती लाभार्थी कमाल** रु.1000/- खर्च करण्यात येतो.

**(8) जिल्हा परिषद उपकर योजना - महिला पशुपालकांना संकरीत गायी खरेदीसाठी अर्थसहाय्य व**
**(9) जिल्हा परिषद उपकर योजना - महिला पशुपालकांना म्हैस खरेदीसाठी अर्थसहाय्य**

**प्रमुख अटी**- (1) अर्जदार महिला पशुपालक असावी. (2) अर्जदाराने स्वखर्चाने संकरीत गायीचा/ म्हशीचा तीन वर्षांचा विमा उतरविणे बंधन कारक राहील. (3) अर्जदार अथवा त्याचा वैवाहिक जोडीदार शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करीत नसावा वा निवृत्त झालेला नसावा. (4) अर्जदाराकडे जनावरासाठी निवारा, पाणी व खाद्य याची सोय असल्याचा ग्रामसेवक, ग्रामपंचायत यांचा दाखला सादर करावा लागेल. (5) एका संकरीत गायी करिता / म्हशी करीता खरेदी किंमतीच्या 50 टक्के परंतू कमाल रू.20,000/-अनुदान लाभार्थीच्या बँक बचत खात्यात थेट जमा करण्यात येते.

**(10) जिल्हा परिषद उपकर योजना - अपंग पशुपालकांना म्हैस खरेदीसाठी अर्थसहाय्य**

**प्रमुख अटी**- (1) अर्जदार पशुपालकाने त्यास किमान 40 टक्के अपंगत्व असल्याचा सक्षम अधिका-याचा स्वसाक्षांकीत दाखला अर्जासोबत सादर करावा. (2) अर्जदाराने स्वखर्चाने म्हशीचा तीन वर्षांचा विमा उतरविणे बंधन कारक राहील. (3) अर्जदार अथवा त्याचा वैवाहिक जोडीदार शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करीत नसावा वा निवृत्त झालेला नसावा. (4) अर्जदाराकडे जनावरासाठी निवारा, पाणी व खाद्य याची सोय असल्याचा ग्रामसेवक, ग्रामपंचायत यांचा दाखला सादर करावा लागेल. (5) एका म्हशी करिता खरेदी किंमतीच्या 90 टक्के परंतू कमाल रू.36000/-अनुदान देण्यात येईल. (6) पशुपालकाने विहित नमुन्यात परिपुर्ण भरलेला अर्ज स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्यात विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहिल. (7) लाभार्थीने करारनामा केल्या नंतर तसेच विम्याची रक्कम पंचायत समिती कडे जमा केल्या नंतर अनुदानाची रक्कम आगाऊ लाभार्थीच्या आधार लिंक बँक बचत खात्यात थेट जमा करण्यात यावी.

**(11) जिल्हा परिषद उपकर योजना - बचत गटातील महिलेला कुक्कुट पक्षी खरेदीसाठी अर्थसहाय्य**

**प्रमुख अटी**- (1) अर्जदार उमेद संस्थेतकडे नोंदणीकृत असलेल्या महिला बचत गटाची सदस्य असावी (2) अर्जदार अथवा त्याचा वैवाहिक जोडीदार शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरीत काम करीत नसावा वा निवृत्त झालेला नसावा. (3) अर्जदाराने त्यांचेकडे कुक्कुट पालनासाठी निवारा, पाणी व खाद्य याची सोय असल्याचा ग्रामसेवक, ग्रामपंचायत यांचा दाखला सादर करावा लागेल. (4) लाभार्थीला किमान 8 ते 10 आठवडे वयाचे 10 कुक्कूट पक्षी (कुक्कूट गट) खरेदी करावे लागतील. (5) कुक्कूट गट सुधारीत देशी (गिरीराज, वनराज, कावेरी इ.) जातीचा खरेदी करावा लागेल. (6) प्रती लाभार्थी एक कुक्कूट गट खरेदी करणेसाठी खरेदी किंमतीच्या 90 टक्के परंतू कमाल रू.1125/- अनुदान लाभार्थीच्या बँक बचत खात्यात थेट जमा करण्यात येते.